# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १७१ वा शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक – प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

नागपूर :– माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा–या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरीत्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले. नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर – अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते. श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक–या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक–या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला. आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण




दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य –असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा–या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रिम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धमेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

# बीड, परभणी, लातूरसह मराठवाड्यातील घटनांमुळे राज्यातील कायदा सुव्यवस्थेसमोर समोर प्रश्नचिन्ह

## निष्पक्ष चौकशी होऊन गुन्हेगारांना कठोर शासन होणे आवश्यक

नागपूर / प्रतिनिधी :– बीड, परभणी, लातूरसह मराठवाडयात आणि संपूर्ण महाराष्ट्रात अलीकडच्या काळातील घडलेल्या घटनांमुळे राज्यातील कायदा आणि सुव्यावस्थेसमोर प्रश्नचीन्ह निर्माण झाले आहे, ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगून राज्यात पून्हा सत्तारुढ झालेल्या सरकारने या संदर्भात त्वरीत कार्यवाही करावी, गुन्हेगारांना कठोर शासन होईल हे पहावे, महाराष्ट्रात पुन्हा भयमुक्त, चितामुक्त वातावरण तयार करावे, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या यांच्या मारेकऱ्यांना अटक अटक करावी विधीमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान गुरुवारी सकाळी विधानसभेत आपातकालीन विषयावर चर्चेत सहभागी होतांना आमदार अमित देशमुख म्हणाले की, परभणी येथे संवीधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यामुळे त्यावर संपूर्ण राज्यात आणि देशात अत्यंत तीव्र प्रतिक्रीया उमटल्या आहेत. यात भर म्हणजे या संदर्भाने परभणी येथील आंदोलनात सहभागी झाल्याच्या संशयावरुन अटक झालेल्या सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा न्यायलयीन कोठडीत संशयास्पद मृत्यु झाला आहे. पोलीसांनीच माझ्या मुलाला मारहान करुन त्याचा खून केला व नंतर मला फोन केला असा आरोप सोमनाथच्या आईन जाहीररीत्या केला आहे, ही बाब अतीशय गंभीर आहे. महाराष्ट्र पोलीसाच्या प्रतीमेला त्यामुळे धक्का पोहचला आहे. या प्रकरणाचा निष्पक्ष तपास होवून सोमनाथच्या मारेकऱ्यांना शिक्षा होणे आवश्यक बनले आहे. संतोष देशमुख खून प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र स्तब्ध: निष्पक्ष चौकशी तपास व्हावा परभणीची घटना घडण्यापुर्वी एक दिवस अगोदर बीड जिल्हयातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांचा अमानुष पध्दतीने खून केल्याची घटना घडलेली आहे. त्या भयावह घटनेचे शब्दात वर्णन करणेही शक्य होत नाही, असे सांगून आमदार देशमुख म्हणाले की, या प्रकारामुळे संपूर्ण महाराष्ट्र स्तब्ध झाला आहे. विधानसभेत या प्रकरणावर चर्चा होत असतांना विरोधक आणि सत्ताधारी या दोन्ही बाजू एकाच स्वरूपाची भाषा बोलत आहेत. त्यामुळे वरील दोन्ही प्रकरणात पोलीसाच्या भूमिकेबद्दल संशय निर्माण झालेला असतांना सरकारकडून निष्पक्ष कठोर कार्यवाहीची महाराष्ट्राला अपेक्षा आहे. बाळू डोंगरे खून प्रकरणी आरोपींना त्वरित अटक करावी फक्त परभणी व बीड या जिल्हयातच कायदा सुव्यवस्था बिघडली आहे असे नव्हे तर मराठवाडयातील सर्व जिल्हयात दररोज अशा घटना घडतांना दिसत आहेत. शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखले जाणाऱ्या आणि शांततेसाठी प्रसिध्द असणाऱ्या लातूर जिल्हयात गेल्या सहा महिन्यात अनेक खून, दरोडे, चोरी आणि हत्येच्या घटना घडल्या आहेत. मागच्या आठवडयात लातूरात एका खाजगी रुग्णालयात काम करणाऱ्या बाळू डोंगरे या तरुणाचा खून झाला आहे, त्या संदर्भाने आरोप असलेल्या आरोपींना पोलीसांनी अद्याप अटक केलेली नाही. आरोपींचा पोलीसांना खरोखरच शोध लागत नाही का हा प्रश्न सर्वत्र विचारूला जाऊ लागला आहे. व्यवस्थित तपास होत नसल्यानेच लातूर गुन्हेगारीत वाढ विधानसभा निवडणुकीपुर्वी राज्यात महायुतीचेच सरकार सत्तेवर होते. ऐन निवडणुकीच्या दरम्यान ८ ऑक्टोंबर रोजी सांयकाळी लातूरच्या गंजगोलाई या बाजारपेठेच्या परीसरात दोन तरुणावर तीक्ष्ण हत्यारांने वार करण्यात आले. त्यात मोहसीन सय्यद याचा मृत्यु



झाला लगेच दुसऱ्या दिवशी सांयकाळी या परीसरात आणखी पैंगबर हाजी मल्लंग सय्यद यांचाही खून झाला. दोन वर्षापुर्वी बाभळगाव येथे बशीर शेख या शेतकऱ्याचा अज्ञात इसमाने खून केला, त्याचाही अद्याप तपास लागलेला नाही, अशा अनेक घटना आहेत. ज्या घटनांचा तपास लागत नाहीत किंवा लावला जात नाही, त्यामुळे दिवसेदिवस गुन्हेगारीत वाढ होत आहे.खरोखरच भ्रष्टाचार गुन्हेगारी संदर्भात झिरो टॉलरन्स होईल काय?राज्यात दुसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून मा. ना. देवेद्र फडणवीस यांनी पदभार स्विकारला आहे. मागच्या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीहोते. गुन्हेगारी आणि भृष्टाचाराच्या बाबतीत ते नेहमी झीरो टॉलरन्स हा शब्दप्रयोग करीत असतांत आता मुख्यमंत्री म्हणून संधी मिळाल्यानंतर तेराज्यातील गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारा बाबतीत काय भुमिका घेतात याची राज्यातील जनतेला उत्सुकता आहे, असेही आमदार देशमुख यांनी उपरोधीकपणे म्हटले. भाग्यश्री सुडे खून खटल्यात जलद गती न्यायालयाची पुन्हा मागणी शिक्षणासाठी पूणे येथे असलेल्या लातूर येथील भाग्यश्री सुडे या विदयार्थीनीचा खंडणीसाठी अपहरण करुन खून करण्यार आला. त्या प्रकारणात गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी म्हणून शासनाच्या वतीने विशेष सरकारी वकीलाची नियुक्ती करण्यात यावी तसेच या प्रकरणाची सुनावणी करण्यासाठी लातूर येथे जलदगती न्यायालयाची स्थापना करावी, अशी मागणी आमदार देशमुख यांनी पुन्हा एकदा आज सभागृहात केली.

# मुंबईतील गुरुद्वारा पाडल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने बजावली नोटीस

नवी दिल्ली : गुरुद्वारा पाडल्याप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर अवमानाची कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नोटीस बजावली. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत या प्रकरणातील स्थिती कायम ठेवण्याचे निर्देश दिले आणि संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावली.


याचिकाकर्ते प्रवीण जीवन वालोद्रा यांची बाजू वकील सौम्या प्रियदर्शनी यांनी मांडली. याचिकाकर्त्याने गुरुद्वारा पाडल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर अवमानाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. मालमत्ता पाडण्यास स्थगिती देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन केल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, २५ ऑक्टोबर २०२४ रोजी मालमत्ता पाडण्यात आली होती. तर १७ सप्टेंबर २०२४ आणि ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते. त्यात न्यायालयाने स्पष्टपणे आदेश दिले होते की, परवानगी घेतल्याशिवाय देशभरात कुठेही तोडफोड केली जाणार नाही. न्यायालयाच्या या आदेशाचे उल्लंघन केल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे. न्यायालयाच्या परवानगीशिवाय ही इमारत पाडली आहे, आणि सदर मालमत्ता रस्त्यावर असण्याचे कारण दिले आहे, ही वस्तुस्थिती याचिकाकर्त्याला दिलेल्या केलेल्या कोणत्याही अंतर्गत पत्रव्यवहारात नोंदवण्यात आलेली नाही.

याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, ते गुरुद्वाराचे व्यवस्थापन करत होते आणि त्या इमारतीतील खोलीत त्यांच्या कुटुंबासह अनेक वर्षांपासून शांततेने राहत होते. १९५५ पासून याचिकाकर्त्यांचे पूर्वज येथे राहत असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते, असा युक्तीवाद करण्यात आला आहे. याचिकाकर्ते आणि त्यांचे पूर्वज भूखंड आणि इमारतीचा मालमत्ता कर भरत होते, असे याचिकाकर्त्याने म्हटले आहे.

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री बाबासाहेब पाटील यांना साकडे निवेदन सादर

लातूर : लातूर जिल्हा रूग्णालय हस्तांतरण निधी वर्ग करून त्वरित भूमिपूजन करावे असे साकडे घालून माझं लातूर परिवाराने उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री बाबासाहेब पाटील यांना निवेदन दिले. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात हा बहुचर्चित प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती देखील करण्यात आली आहे. लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील केली आहे. मात्र अद्याप यासाठीचा निधी आरोग्य विभागाने कृषी विभागास वर्ग केलेला नाही. हा निधी त्वरीत वर्ग करून लातूरच्या प्रलंबित आणि मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन करून लातूरकरांना उपकृत करावे अशी विनंती यावेळी शिष्टमंडळाने केली. हा निधी वर्ग करून ६० दिवसांच्या आत जिल्हा रूग्णालय हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली





पाहिजे असा शासन आदेश १९ जून २०२४ रोजी काढण्यात आला आहे. याची मुदत १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपली आहे. लातूर जिल्हा रूग्णालय व्हावे यासाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात जाऊन तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना विनंती केली होती. राज्याचे प्रमुख आणि संवेदनशील, जाणकार उपमुख्यमंत्री, मंत्री म्हणून आपण हा प्रश्न त्वरित मार्गी लागेल यासाठी त्वरीत निर्देश द्यावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळात ड. बालाजी पांचाळ, विशाल विहिरे, प्रशांत पाटील, बबन भोसले या सदस्यांचा समावेश होता. निवेदनावर परिवारातील ३५ मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही वेळ शिष्टमंडळाने मागितली असून त्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात येईल. तसेच हा प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढून भूमिपूजन करावे अशी आग्रही विनंती करणार असल्याचे ड.बालाजी पांचाळ यांनी सांगितले आहे.

संपादकीय....

# दिसानायके यांच्या दौर्याची फलनिष्पती

भारत –श्रीलंका यांच्यात बौद्धिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक संबंधांचा पारंपरिक वारसा आहे. दोन्ही देशांमधील संबंध २ हजार ५०० वर्षांहून अधिक जुने आहेत. हिंद महासागरात असणारा श्रीलंका सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा देश आहे. श्रीलंकेतील अनेक लोकसमूह भारतीय वंशाचे आहेत, तरीही स्वातंत्र्यानंतर वांशिकतेबाबत मतभेदांमुळे दोन्ही देशांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

पिढ्यान् पिढ्या श्रीलंकेत राहणार्या तमिळ नागरिकांनी तमिळ इलम राज्याच्या मागणीसाठी, त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरू केला होता. त्यामुळे १९७६ ते २००८ पर्यंतचा काळ हा पूर्णतः संघर्षाने भरलेला होता. तमिळ आणि सिंहली या दोन्ही बाजूंनी नरसंहार झाला. यामुळे भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनाही शहीद व्हावे लागले. एलटीटीईचा नेता प्रभाकरनच्या हत्येनंतर हा संघर्ष कमी झाला आणि श्रीलंका सरकारने तमिळींना समान अधिकार देण्याचे मान्य केले. तथापि, तमिळ नागरिकांना पूर्ण अधिकार देण्याबाबत अजूनही बरेच काही होणे बाकी आहे. तेव्हापासून आतापर्यंत भारत–श्रीलंका संबंधांमध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. अर्थात, संबंधांमध्ये चढ–उतार असतानाही भारताने श्रीलंकेला नेहमीच मदत केली आहे. दीड वर्षापूर्वी श्रीलंका जेव्हा आर्थिक अराजकतेच्या संकटात सापडला होता आणि नागरी उठावाने थेट या देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधानांना घेरले होते तेव्हा भारताने या देशाला आर्थिक मदत केली होती. या संकटानंतर अलीकडेच झालेल्या सत्ता परिवर्तनात अनुरा कुमारा दिसानायके राष्ट्राध्यक्ष झाले. दिसानायके हे डाव्या विचारसरणीचे असून ते चीन समर्थक मानले जातात. त्यामुळेच दिसानायके सत्तेवर आल्याने भारताचे संबंध बिघडू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात होती; पण ही भीती फोल ठरवत राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दिसानायके यांनी पहिल्या विदेश दौर्यासाठी भारताची निवड केली, ही आपल्यासाठी दिलासादायक बाब आहे. त्यांनी दिल्लीत येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेण्याला अनेक अर्थ आहेत. या भेटीमुळे दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये नवी गती आणि ऊर्जा निर्माण झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपला देश, आपली माती ही कदापि भारताविरुद्ध वापरू देणार नाही, अशी ग्वाही दिसानायके यांनी दिली. भारताच्या हिताला बाधक असे कोणतेही काम श्रीलंका होऊ देणार नाही, हे त्यांचे अभिवचन वर्तमानातील दक्षिण आशियातील परिस्थितीमध्ये महत्त्वाचे आहे.

दिसानायके यांच्या भेटीदरम्यान भारत आणि श्रीलंकादरम्यान इलेक्ट्रिक ग्रिड कनेक्टिव्हिटी आणि बहुउत्पादन पेट्रोलियम पाईपलाईन उभारण्याचे काम केले जाईल, अशी घोषणा पंतप्रधान मोदींनी केली. ते म्हणाले की, भारत श्रीलंकेतील वीज प्रकल्पांना एलएनजी पुरवेल. भारताने श्रीलंकेला ५ अब्ज डॉलर्सचे कर्ज दिल्याचे पंतप्रधान मोदींनी पत्रकार परिषदेत सांगितले. श्रीलंकेतील रेल्वे व्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी भारत आर्थिक आणि तांत्रिक मदत करेल, अशी घोषणा त्यांनी केली. श्रीलंकेतील १ हजार ५०० नागरी सेवकांना भारतात प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. भारत आणि श्रीलंका यांच्यातील संरक्षण कराराला अंतिम स्वरूप देण्याचा निर्णय आम्ही घेतला होता, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. आता आम्ही भारत आणि श्रीलंकादरम्यान नवीन फेरी सेवा सुरू करणार आहोत. श्रीलंका सरकार तमिळ जनतेच्या आकांक्षा पूर्ण करेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. याखेरीज पुढील वर्षापासून जाफना आणि पूर्व प्रांतातील विद्यापीठांमध्ये भारत सरकारकडून २०० विद्यार्थ्यांना मासिक शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. एवढेच नाही, तर श्रीलंकेत आधार कार्ड बनवण्याच्या प्रकल्पातही भारत मदत करणार आहे. दोन्ही नेत्यांनी मच्छीमारांच्या प्रश्नांवरही चर्चा केली आणि हा प्रश्न मानवतावादी दृष्टिकोनातून सोडवण्याचा निर्णय घेतला आहे.

श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनी आपली भूमी भारताच्या सुरक्षेविरुद्ध कोणालाही वापरू देणार नाही, हे आश्वासन अशा वेळी आले आहे जेव्हा चीन भारताविरोधात आक्रमकपणे आपल्या हिंदी महासागर मोहिमेचा पाठपुरावा करत आहे. खरे तर, श्रीलंकेत चीनच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे भारताची चिंता वाढली होती आणि आजही ती कायम आहे. दोन वर्षांपूर्वी श्रीलंका कर्ज फेडण्यात अपयशी ठरल्यावर चीनने त्यांच्या हंबनटोटा बंदरावर कब्जा केला. चीनने सागरी पाळत ठेवणारे गुप्तचर जहाज येथे तैनात केले आहे. चिनी नौदलाचे युआन वांग हे जहाज ५ ऑगस्ट २०२२ मध्ये दक्षिणी श्रीलंकेत हंबनटोटा येथे डॉक झाले. यानंतर नोव्हेंबर २०२३ पर्यंत १४ महिन्यांच्या आत दोन चिनी हेरगिरी जहाजांना श्रीलंकेच्या बंदरांमध्ये गोदी करण्यास परवानगी देण्यात आली. चिनी संशोधन जहाज ६ ऑक्टोबर २०२३ रोजी श्रीलंकेत आले आणि कोलंबो बंदरात डॉक केले. हे जहाज तैनात करण्यामागचा उद्देश सागरी पर्यावरणावरील संशोधन आहे, असे सांगण्यात आले असले, तरी चीनच्या दाव्यांवर विश्वास ठेवणे शक्य नाही. त्यामुळेच भारत आणि अमेरिकेने याबाबत चिंता व्यक्त केली होती. चिनी जहाजे हेरगिरीची जहाजे असू शकतात अशी भीती व्यक्त केली होती आणि कोलंबोला अशा जहाजांना आपल्या बंदरांवर थारा देऊ नये, असे आवाहन केले होते. भारताने चिंता व्यक्त केल्यानंतर श्रीलंकेने जानेवारीत परदेशी संशोधन जहाजांना आपल्या बंदरात येण्यास बंदी घातली होती.

# वन नेशन वन इलेक्शन योग्यच; याचप्रमाणे वन नेशन वन पेंशनअमलात आणली पाहिजे.

एक देश एक निवडणूकमुळे देशाचा अवाजवी खर्च कमी होईल. त्यामुळे एक देश एक निवडणूक हा निर्णय स्वागतार्ह आहे.याचप्रमाणे सरकारने पेंशनच्या बाबतीत संसदेमध्ये विधेयक आणायला पाहिजे. कारण माजी आमदार, खासदार, मंत्री व अन्य राजकीय पुढारी यांना ४० हजार रूपयांपेक्षा जास्त पेंशन घेतात.सोबतच अनेक सरकारी सवलती व भत्ते त्यांना शासनाकडून मिळत असते अशाप्रकारे निवृत्त राजकीय पुढारी दर महिन्याला शासनाकडून आपला फायदा करून घेत असतात.राजकीय पुढाऱ्यांचा म्हणजेच आमदार, खासदार, मंत्री हा कार्यकाळ फक्त पाच वर्षांचा असतो. हा कार्यकाळ लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी म्हणून सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने असतो.परंतु पदावर असतांना लाखों रूपयांचा पगार व निवृत्ती नंतर हजारो रुपये पेन्शन घेतात. यामुळे देशाला व राज्यांना मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागतो. परंतु राजकीय पुढाऱ्यांची पेंशन व पगार बंद करता येत नाही किंवा कमी करता येत नाही अशा पध्दतीची आपल्या सोयीनुसार त्यांनी कायद्यामध्ये तरतूद सुध्दा करून ठेवली आहे.त्यामुळे त्यांचे पगार व पेंशन नेहमी वाढत असते.हे भारतासारख्या लोकशाही देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. कारण लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी देश सेवा करण्यासाठी असतात मग यांना कशाला हवा पगार, भत्ते व पेंशन!ही मंडळी समाजकार्य करायला निघाले की पैसा कमवायला हा ही मोठा प्रश्न आज देशाच्या १४० कोटी जनतेपुढे उपस्थित होतो.दिनांक १९ डिसेंबर २०२४ ला दैनिक लोकमत वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या बातमी नुसार उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांना केवळ १० ते १५ हजार रुपये पेन्शन मिळत असल्याचे उघडकीस आले. आणि अशाप्रकारची अल्पशी पेंशन जर उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना मिळत असेल तर पेंशनधारकांचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. यापेक्षा दयनीय व गंभीर परिस्थिती ईपीएस–९५ पेंशन धारकांची आहे.त्यांना तर आज जगण्याइतकीही पेंशन मिळत नाही ही स्वतंत्र भारताची शोकांतिका आहे.आज देशातील दिड करोड ईपीएस–९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शनधारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा१००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य पक्ष–विपक्ष किंवा सरकारला का दिसत नाही? असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.त्यामुळे आज सरकारला विचार करण्याची गरज आहे की राजकीय पुढाऱ्यांची, उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांची पेंशन व देशातील दिड करोड ईपीएस ९५ पेंशन धारक यांची पेंशन यामध्ये तफावत का? असे तर नाही ना की राजकीय पुढारी खूप काम करतात व घाम गाळतात आणि उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व ईपीएस ९५ पेंशन धारक काहीच काम करीत नाही म्हणून त्यांना कमी पेंशन व राजकीय पुढाऱ्यांना जास्त पेंशन असाही प्रश्न आज देशातील १४० कोटी जनतेपुढे उपस्थित होतो.यात राजकीय पुढारी मेहनती की उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश मेहनती की देशाचा शिल्पकार कामगार ईपीएस ९५ पेंशन धारक मेहनती ही बाब आता सरकारला ठरवायची वेळ आली आहे.जो व्यक्ती आपल्या नौकरीच्या कार्यकाळ २० ते ३० वर्ष सेवा देतो त्याला अल्पशी पेंशन आणि जो राजकीय पुढारी ज्याचा कार्यकाळ फक्त ५ वर्षांचा असतो त्याला गलेलठ्ठ पेंशन व पगार ही बाब कोणत्याच नियमात बसत नाही.आपण जेव्हा एक देश एक निवडणूक विधेयक पारित करतो तेव्हा देशातील सर्वसामान्य पेंशन धारकांचा सुध्दा विचार सरकारने करायला हवा.एक देश एक निवडणूक व्हायलाच पाहिजे यात दुमत नाही. त्याचप्रमाणे देशातील संपूर्ण पेंशन धारकाचा विचार सुध्दा व्हायला पाहिजे तेव्हाच समानता प्रस्थापित होईल.सरकार ईपीएस–१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी व पेन्शनसाठी वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू आहे याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे.ईपीएस ९५ पेंशन बद्दल सुप्रीम कोर्टाने सुध्दा सरकारला बजावले की त्यांना कमीत कमी जगण्याइतकी तरी पेंशन मिळायला पाहिजे.तेही त्यांना मिळत नाही.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारक आणि उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश यांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.त्याचप्रमाणे वन नेशन वन इलेक्शन प्रमाणे वन नेशन वन पेंशनयोजना अंमलात आणुन देशातील प्रत्येक तळागाळातील व्यक्तींना समाधानकारक पेंशन दिली पाहिजे यात भेदभाव नकोच. जय हिंद!

**************

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर).
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# चिंता वाढत्या कर्जबाजारीपणाची

देशातील जनतेच्या डोक्यावरील कर्जाचा भार दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर आलं आहे. एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीणसह शहरी भागातील जनता कर्जाच्या विळख्यात अडकली आहे.

जागतिकीकरणानंतर बदललेल्या अर्थकारणामुळे पैशांचा ओघही वाढत गेला. याची झळे ज्यांना मिळाली त्यांची आर्थिक स्थिती सुधारत गेली. पण त्याचबरोबर आर्थिक विषमताही वाढत गेली. ती वाढत वाढत आता दहा टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीच्या ७० टक्के संपत्ती एकवटण्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. याचाच दुसरा अर्थ उर्वरित ९० टक्के जनता केवळ ३० टक्के संपत्तीच्या श्रेणीत आहे.

या श्रेणीतील वर्ग एका बाजूला वाढत्या आशाआकांक्षा, वाढलेल्या गरजा, वाढलेली महागाई, त्यातून जीवन जगण्यासाठीचा वाढलेला खर्च, चांगले शिक्षण–आरोग्य यांसाठी मोजावा लागणारा भरमसाठ पैसा आणि दुसरीकडे बेरोजगारी, कामगार कपात, आर्थिक मंदी, नैसर्गिक आपत्ती यांमुळे आक्रसलेले उत्पन्न यांचा सामना करत गुजराण करत आहे. अशा स्थितीमध्ये जगताना तरून जाण्यासाठी कर्जाचा आधार गरजेचा ठरत गेला.




काही वर्षांपूर्वीपर्यंत खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन वर्षानुवर्षे त्यांचे हप्ते भरत राहणार्यांची आणि या कर्जखात्यांचे नूतनीकरण करणार्यांची संख्या मोठी होती. पण कायद्यांच्या मार्गाने सावकारशाहीचे पाश आवळले गेले व पुढे बँकिंग सेवांचा प्रसार–प्रचार आणि विस्तार मोठ्या प्रमाणावर होत गेल्याने कर्जदाता बदलला. आज बँका, सहकारी पतसंस्था, एनबीएफ्सी यांसारख्या वित्तपुरवठा करणार्यांची सद्दी इतकी झाली आहे आणि त्यांच्यामधील स्पर्धा इतकी तीव्र बनली आहे की, पूर्वी कर्ज मिळवण्यासाठी करावी लागणारी यातायात संपून, आता ‘कर्ज हवे आहे का’ यासाठी रेटा लावला जात आहे.

बदलत्या काळात क्रेडिट कार्ड नावाचा प्लॅस्टिक मनी अवतरला आणि त्याने बहुतांश जणांच्या खिशातून हजारो कोटी रुपये केवळ दंडाच्या रूपातूनच वसूल केले. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०२२–२३च्या आकडेवारीच्या आधारे सांख्यिकी मंत्रालयाने अलीकडेच जारी केलेला वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षण अहवाल देशातील नागरिकांवर वाढलेल्या कर्जाच्या ओझ्यावर नवा प्रकाश टाकणारा आहे. या अहवालानुसार, भारतातील खेड्यांमध्ये १ लाख लोकांमागे १८ हजार ७१४ लोक आहेत ज्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कर्ज घेतले आहे, तर शहरांमध्ये हा आकडा १७ हजार ४४२ इतका आहे.

विशेष म्हणजे देशाच्या ग्रामीण भागातील महिलांवर कर्जाचा बोजाही जास्त आहे. गावातील एक लाख महिलांपैकी १३ हजार १६ महिला कर्जबाजारी आहेत, तर शहरांमध्ये १० हजार ५८४ महिला कर्जदार असल्याचे आढळून आले. शहरातील लोकांपेक्षा खेड्यातील लोकांवर कर्जाचा बोजा जास्त असल्याचे हे दुष्टचक्र अनेक वर्षांपासून सुरू आहे.

२०१६च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवालानुसार, खेड्यांतील ३१.४ टक्के कुटुंबांनी कर्ज घेतले होते, तर शहरांमधील २२.४ टक्के कुटुंबे कर्जबाजारी होती. त्या आकडेवारीवरून असेही दिसून आले की खेड्यांमध्ये व्यावसायिक (बँका) आणि गैर–व्यावसायिक संस्थांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अनुक्रमे ५६ आणि ४४ टक्के होते. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, शहरी भागातील लोकांप्रमाणेच ग्रामीण भागातही ईएमआयवर वस्तू खरेदी करणार्यांची संख्या वाढत आहे. पण कर्जबाजारीपणा वाढण्याचे ते एकमेव किंवा प्रमुख कारण बिलकूलच नाहीये.

मुळातच प्रचंड प्रमाणात वाढत चाललेल्या महागाईमुळे आज शहरी आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचा मासिक खर्च भरमसाठ वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळे देशात कर्जबाजारीपणा वाढत चालला आहे. गेल्या १० वर्षांमध्ये ग्रामीण भागात कुटुंबाचा खर्च १६४ टक्क्यांनी वाढला आहे, तर शहरी भागात कुटुंबाचा खर्च हा १४६ टक्क्यांनी वाढल्याची माहिती याच अहवालात देण्यात आली आहे. पण गेल्या दहा वर्षांत उत्पन्न मात्र वाढलेले नाही. उलट बेरोजगारीसारख्या समस्यांमुळे उत्पन्नात घटच झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी झालेले दिसतात.

देशातील शेतकर्यांनी घेतलेल्या कर्जात सातत्याने वाढ होत आहे. प्राधान्य क्षेत्र कर्ज नियमानुसार, सरकारने बँकांना त्यांच्या एकूण कर्जाच्या १८ टक्के कृषी आणि संबंधित क्षेत्राला प्रदान करणे बंधनकारक केले आहे. पाच वर्षांपूर्वी शेतकर्यांना दिलेले पीककर्ज ८.२५ लाख कोटी रुपये होते. २०२३–२४ या वर्षात शेतकर्यांना दिलेले एकूण कर्ज २५.४७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. वाढता उत्पादन खर्च, शेतकर्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव नसणे यामुळे देशातील अन्नदाता कर्जबाजारी होत चालला आहे.

शहरी भागात सुबत्ता दिसत असली तरी चैनीची प्रवृत्ती वाढत चालल्यामुळे आणि प्रतिष्ठेखातर आलिशान जीवनशैलीसाठी खर्च करण्याची मानसिकता बळावत चालल्याने मोठ्या प्रमाणावर शहरी कुटुंबे कर्जाच्या बोजात बुडाली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या एका आकडेवारीनुसार, एप्रिल २०२३ मध्ये भारतातील क्रेडिट कार्डची एकूण थकबाकी २ लाख कोटी रुपयांवर गेली आहे.

एप्रिल २०२३ मध्ये हा आकडा २ लाख २५८ कोटी रुपये इतका होता. २०२२ च्या तुलनेत तो सुमारे ३० टक्क्यांनी अधिक होता. इतिहासात पहिल्यांदाच क्रेडिट कार्डवरील थकबाकीचा आकडा २ लाख कोटी रुपयांच्या पार गेल्याने आरबीआयनेही याबाबत चिंता व्यक्त केली होती.

दुसरीकडे बँका आणि वित्तीय संस्थांकडून दिल्या गेलेल्या वैयक्तिक कर्जामध्ये मोठी वाढ झाली आहे. जुलै २०२४ अखेरीस ते तब्बल ५५.३ लाख कोटी रुपये झाले आहे. अलीकडील काळात गोल्ड लोन देणार्या कंपन्यांची प्रक्रिया सुलभ झाली आहे आणि ते देणार्या कंपन्याही वाढल्या आहेत. पण यामुळे देशात कधी गरजेसाठी तर कधी हा पैसा शेअर बाजारात गुंतवून भरभक्कम परतावा मिळवण्यासाठी सोने गहाण ठेवणार्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत सोन्याच्या दागिन्यांसाठी बँकांनी दिलेल्या कर्जात तब्बल ५०.४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. इतर प्रत्येक वैयक्तिक कर्ज विभागातील क्रेडिट सिंगल डिजिटमध्ये वाढले असताना ही वाढ लक्षणीय ठरत आहे. आरबीआयच्या अहवालानुसार ऑक्टोबर २०२४ पर्यंत थकित सोन्याची कर्जे १ लाख ५४ हजार २८२ कोटी रुपये होती. मार्च २०२४ अखेर हा आकडा १ लाख २ हजार ५६२ कोटी रुपये होता.

ही सर्व आकडेवारी थक्क करणारी आहे. यामुळे ‘विकसित’ होऊ पाहणारा भारत कर्जाच्या बोजाखालचा देश असल्याचे स्पष्ट होत आहे. आर्थिक विकासाचा दर उंचावत असताना, देशाच्या जीएसटी संकलनात, प्रत्यक्ष करसंकलनात वाढ होत असताना, जगभरातील पतमानांकन संस्थांकडून भारताचे आर्थिक भविष्य उज्ज्वल असल्याचे सांगितले जात असताना देशात कर्जात बुडालेल्यांचे वाढते प्रमाण भविष्यात मोठ्या संकटाची नांदी ठरण्याची भीती काही अभ्यासक वर्तवत आहेत. त्यामुळे धोरणकर्त्यांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

# फक्त पेरु नव्हे तर पेरुची पाने देखील आहेत गुणकारी! रोज पेरुची पाने चघळण्याची सहा कारणे

पेरु खायला अनेकांना आवडतो. पेरु खाण्याचे काही फायदेही आहेत पण पेरुसह पेरुची पाने खाणे देखील अत्यंत फायदेशीर असते हे तुम्हाला माहित आहे का? पेरुची पाने अत्यंत निरोगी असतात आणि पारंपारिक औषधांमध्ये बऱ्याच काळापासून वापरली जात आहेत. ते अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्वे आणि दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असतात, ज्यामुळे ते आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतात.

अधिकाधिक लोक चांगल्या आरोग्यासाठी नैसर्गिक उपायांकडे वळत असल्याने, पेरुच्या पानांना त्यांच्या उपचारात्मक क्षमतेसाठी ओळखले जाते. पण ते इतके प्रभावी कशामुळे बनते आणि आपल्या दिनचर्येत त्यांचा समावेश केल्याने आरोग्यास फायदा कसा होऊ शकतो?

पेरुच्या पानांमधील मुख्य पोषक किंवा संयुगे सल्लागार आहारज्ज्ञ आणि प्रमाणित मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा दी इंडियन एक्स्प्रेलला सांगतात की, पेरुची पाने अनेक महत्त्वपूर्ण जीवनसत्वे आणि बायोएक्टिव्ह संयुगाचा समृद्ध स्त्रोत आहेत जे पोषणात त्यांचे महत्त्व देखील ठरवतात. ते व्हिटॅमिन सी (सुमारे १०३ मिलीग्रॅम प्रति १०० ग्रॅम) च्या सर्वात श्रीमंत स्त्रोतांपैकी एक आहेत, जे रोगप्रतिकारक कार्य आणि त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे आणि व्हिटॅमिन बी, ऊर्जा चयापचय आणि संज्ञानात्मक(आकलन, स्मरण इ.) आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

जीवनसत्वे व्यतिरिक्त, पेरुची पाने कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारख्या खनिजांचा चांगला स्त्रोत आहेत. हे पोषक हाडांच्या आरोग्यामध्ये आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रणालीच्या कार्यामध्ये भूमिका बजावतात. पानांमध्ये क्वेर्सेटिन, कॅटेचिन आणि गॅलिक ऍसिड सारख्या पॉलिफेनॉलिक संयुगे समृद्ध असतात, जे त्यांच्या मजबूत अँटिऑक्सिडंट गुणधर्मांसाठी ओळखले जातात जे ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि दाहकता कमी करतात. या संयुगाचे प्रतिजैविक आणि दाहक-विरोधी गुणधर्म असल्याने एकंदर चांगल्या आरोग्यासाठी फायदेशीर अन्न म्हणून पेरुची पानांना ओळखले जाते, असे मल्होत्रा सांगतात.

पेरुची पाने चांगले कोलेस्ट्रॉल (एचडीएल) वाढवताना वाईट कोलेस्ट्रॉल (एलडीएल) कमी करू शकतात, त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्याला चालना मिळते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.



रोज पेरुची पाने चघळण्याचे सहा फायदे

पेरुची पाने दररोज चघळल्याने त्यांच्या समृद्ध पोषक तत्व आणि औषधी गुणधर्मांमुळे अनेक आरोग्य फायदे मिळू शकतात. मल्होत्रा यांनी सांगितल्याप्रमाणे येथे सहा प्रमुख फायदे आहेत:

पेरुच्या पानांमध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म आणि उच्च फायबर घटक असते, जे आतडे आरोग्यास प्रोत्साहन देते, बद्धकोष्ठता दूर करते आणि संपूर्ण पचन सुधारते.

ही पाने रक्तातील ग्लुकोजची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात, जे जेवणानंतर रक्तातील साखरेमध्ये लक्षणीय वाढ रोखून मधुमेह किंवा धोका असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर ठरतात.

पेरुची पाने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात, शरीराला उच्च अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी पातळीसह संक्रमण आणि रोगांशी अधिक प्रभावीपणे लढण्यास मदत करतात.

पेरुची पाने चांगले कोलेस्ट्रॉल (एचडीएल) वाढवताना वाईट कोलेस्ट्रॉल (एलडीएल) कमी करू शकतात, त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्याला चालना मिळते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

पेरुच्या पानांमधील अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करण्यात मदत करतात, सेल्युलर नुकसान टाळून कर्करोगाचा धोका कमी करतात.

पेरुची पाने मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी काही पारंपारिक वेदनाशामक औषधांपेक्षा अधिक प्रभावीपणे दर्शविले गेले आहेत, ज्यामुळे डिसमेनोरियाचा (वूाशर्पीहशर) अनुभवत असलेल्या स्त्रियांना नैसर्गिकपणे आराम मिळतो.

हेही वाचा -हिवाळ्यात आपण आपल्या पाळीव प्राण्यांना किती वेळा अंघोळ घालावी? तज्ज्ञ काय सांगतात.

पेरुची पाने सेवन करण्याआधी सावधगिरी बाळगा

आपल्या दैनंदिन आहारात पेरुची पानांचा समावेश करण्यापूर्वी, अनेक सावधगिरींचा विचार करणे आवश्यक आहे. मल्होत्रा नमूद करतात, प्रथम, संयम आवश्यक आहे. पेरुच्या पानांमध्ये भरपूर फायबर असल्यामुळे, त्यामुळे जास्त प्रमाणात खाल्ल्याने पोट फुगणे, गॅस किंवा अतिसार यासारख्या पाचक समस्या उद्भवू शकतात. माफक प्रमाणात सेवन करण्यापासून सुरुवात करा आणि ते सहन होईल एवढ्या प्रमाणात त्याचे सेवन हळूहळू वाढवणे चांगले आहे. पेरुच्या पानांमुळे काही लोकांमध्ये एलर्जीची प्रतिक्रिया देखील होऊ शकते, विशेषत: जे उष्णकटिबंधीय फळांसाठी संवेदनशील असतात. या प्रतिक्रिया सूज किंवा खाज म्हणून दिसू शकतात.

गरोदर आणि बाळाला स्तनपान करणाऱ्या महिलांनी पेरुच्या पानांचा अर्क घेण्यापूर्वी आरोग्यसेवा व्यावसायिकांचा सल्ला घ्यावा, कारण त्यांची सुरक्षितता योग्य रित्या स्थापित केलेली नाही. याशिवाय, पेरुची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करू शकतात आणि मधुमेहावरील औषधांशी संवाद साधू शकतात, म्हणून मधुमेह असलेल्या व्यक्तींनी त्यांच्या रक्तातील ग्लुकोजच्या पातळीचे बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. ज्यांना एक्जिमासारख्या त्वचेची समस्या आहे त्यांनी सावधगिरी बाळगली पाहिजे कारण पेरुच्या पानांमुळे त्रास होऊ शकते, असेही मल्होत्रा नमूद करतात.

## डॉ.बाबासाहेबांमुळेच जिवंतपणी सात जन्माचा स्वर्ग अनुभवला-डॉ.हुलगेश चलवादी देशाच्या गृहमंत्र्यांनी आंबेडकरी अनुयायांची माफी मागावी

पुणे/ प्रतिनिधी :- देशातील सर्वसामान्यांना,गोरगरिब, शोषित, पीडितांना हक्क बहाल करणारे संविधान निर्माते परमपूज्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आंबेडकरी अनुयायी कदापि सहन करणार नाही.बाबासाहेबांमुळे सर्वसामान्यांनी, शोषित, वंचितांनी जिवंतपणीच स्वर्ग अनुभवला.



बाबासाहेबांचे नाव घेणे हि कुठली फॅशन नाही, तर ती आंबेडकरी अनुयायांची 'पॅशन' आहे.बाबासाहेब म्हणजे समता, बंधुता, सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा , उपासनेचे स्वातंत्र, दर्जाची व संधीची समानता, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता. त्यामुळे घटनाकार डॉ.बाबासाहेबांचा अपमान करणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासीयांची आणि आंबेडकरी अनुयायांची माफी मागावी, अशी मागणी बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.१९) केली. बाबासाहेबांनी तथागत गौतम बुद्धांच्या मार्गावर चालण्याची शिकवण अनुयायांना दिली आहे. बाबासाहेबांचे विचारच आमच्यासाठी स्वर्ग आहेत. बाबासाहेबांच्या दूरदृष्टिमुळेच लाखो कुळांचा उद्धार झाला आहे. देशाचा उद्धारकर्त्या महामानवाचा देशाच्या सर्वोच्च सभागृहात अपमान होणे ,हि बाब समस्त देशवासीयांची मान शरमेने खाली घालणारी आहे, अशी खंत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली. बसपा सुप्रीमो उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुश्री बहन मायावती जी यांनी देखील अमित शहा यांच्यासह राजकीय पक्षांकडून सुरु असलेल्या राजकारणावर भाष्य केले आहे. भाजप, काँग्रेस आणि इतर पक्षांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वापरून राजकीय पोळी शेकून न घेता त्यांचा आदर-सन्मान केला पाहिजे. या पक्षांचे दैवत कुणीही असले तरी त्यावर बसपाला कुठलाही आक्षेप नाही. परंतु, दलित तसेच इतर मागासवर्गीयांसाठी बाबासाहेबच एकमेव दैवत आहे. बाबासाहेबांमुळेच या वर्गांना ज्या दिवसापासून देशात संविधान लागू झाले त्या दिवसापासून सात जन्माचे स्वर्ग मिळाले. काँग्रेस, भाजप तसेच इतर पक्ष दलित तसेच इतर उपेक्षितांबद्दल दाखवत असलेले प्रेम हे दुट्टपी आहे. या पक्षांकडून या वर्गांचे हित जोपासना आणि कल्याण अशक्य आहे. बहुजन समाज तसेच महान संत , गुरु ,महापुरुषांचा संपूर्ण आदर सन्मान केवळ बसपा सरकार मधेच मिळू शकेल, अशी बसप ची भूमिका असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्र कुठल्याही महापुरुषाचा, महामानवाचा अपमान शहरं करून घेणार नाही. त्यामुळे शहा यांच्या वक्तव्यामुळे आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्याने त्यांनी माफी मागावी, या मागणीचा पुनरूच्चार डॉ. चलवादी यांनी केला.

## आले-लिंबाचे पाणी खरंच यकृताच्या आरोग्यासाठी योग्य आहे का? शरीरावर कसा होतो परिणाम?

कृत शरीरातील सर्वांत महत्त्वाच्या अवयवांपैकी एक आहे, जो डिटॉक्सिफिकेशन, प्रथिने संश्लेषण व पचन यांसह ५०० पेक्षा जास्त आवश्यक कार्ये करतो. आधुनिक जीवनशैली, खराब आहाराच्या निवडी, प्रदूषण व तणाव यांमुळे यकृताला अनेकदा विषाक्त आणि हानिकारक पदार्थसेवनाचा फटका बसतो. तुमच्या नित्यकर्मात यकृताची सफाई करणारे हे पेय समाविष्ट केल्याने त्याच्या कार्यांना समर्थन मिळू शकते आणि संपूर्ण आरोग्य चांगले राखण्यास मदत होते.



डॉ. सुदीप खन्ना सांगतात की, कित्येकांकडून अनेकदा लिंबू-आले पाणी, बीटरूट ज्यूस यांसारख्या पेयांसह यकृतासाठी अनुकूल असलेल्या पेयांबद्दल विचारणा केली जाते. ही पेये यकृताची सफाई करू शकतात किंवा डिटॉक्स ड्रिंक्स प्रभावी असल्याचे कोणत्याही अभ्यासातून दिसून आलेले नाही आणि तसा कोणताही पुरावा त्यांच्या बहुतेक दाव्यांचे समर्थन करत नाही. निरोगी प्रौढांमध्ये यकृत विषाक्त पदार्थांना निरुपद्रवी बनविण्यास आणि ते आपल्या शरीरातून काढून टाकण्यास सक्षम असते. लिव्हर क्लीन्स आणि डिटॉक्स ड्रिंक्समध्ये आरोग्याला चालना देणारे घटक असू शकतात; परंतु तुमच्या आरोग्यामध्ये लक्षणीय फरक आणण्यासाठी त्यामध्ये पुरेसे आवश्यक घटक नसू शकतात. पण, ही पेये निरोगी जीवनशैलीला पूरक ठरू शकतात आणि आपल्या यकृताला पोषक घटकांसह आधार देऊ शकतात.

यकृताच्या आरोग्यासाठी डिटॉक्स पेय

च

च

निरोगी लोकांमध्ये यकृत शरीरातील विषाक्त घटक शरीराबाहेर काढण्याचे कार्य खूप चांगल्या पद्धतीने करते. पण, जर आपण खराब अन्नपदार्थ खाल्ले, जास्त मद्यपान केले किंवा काही औषधे घेतली, तर यकृताला योग्यरीत्या काम करणे कठीण होऊ शकते. यकृताची सफाई करणारे पेय आणि डिटॉक्स ड्रिंक्समध्ये आरोग्याला चालना देणारे घटक असू शकतात; परंतु तुमच्या आरोग्यामध्ये लक्षणीय फरक घटक घडवून आणण्यासाठी त्यामध्ये पुरेसे आवश्यक घटक नसू शकतात. पण, ही पेये निरोगी जीवनशैलीला पूरक ठरू शकतात आणि आपल्या यकृताला पोषक घटकांसह आधार देऊ शकतात.

लिंबू-आले पाणी : लिंबू व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहे, जे यकृताला डिटॉक्सिफिकेशनसाठी आवश्यक एन्झाइम तयार करण्यास मदत करू शकते. दुसरीकडे आल्यामध्ये दाहकविरोधी गुणधर्म असतात आणि ते पचनास प्रोत्साहन देते. त्यामुळे यकृताला फॅट्सवर प्रक्रिया करण्यास आणि विषाक्त पदार्थ बाहेर काढण्यास मदत मिळते.

बीटाचा रस : बीटरूट हे यकृतासाठी सुपरफूड आहे, जे यकृताचे कार्य उत्तेजित करण्याच्या आणि पेशी पुन्हा निर्माण करण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जाते. बेटेन (एक प्रकारचा अँटिऑक्सिडंट), नायट्रेट्स व फायबरने समृद्ध, बीटर पित्त प्रवाहास समर्थन देते, जे फॅट्स नष्ट करण्यासाठी आणि विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. तसेच यकृतातील दाहकता कमी करते.

हळदीचा चहा : हळदीतील कर्क्युमिन हे सक्रिय संयुग पित्त उत्पादनास उत्तेजन देते आणि यकृताच्या पेशींना विषामुळे होणार्या नुकसानापासून वाचवते. हे दाहकता कमी करण्यास मदत करते आणि यकृताच्या पेशींच्या पुनरुत्पादनात मदत करते.

ग्रीन टी : हे एक सुप्रसिद्ध अँटिऑक्सिडंटयुक्त पेय आहे. ग्रीन टीमधील कॅटेचिन्स हा एक प्रकारचा अँटिऑक्सिडंट यकृतातील फॅट्स कमी करण्यास आणि रोगांपासून संरक्षण करण्यास मदत करतो.

ग्रीन टीच्या नियमित सेवनाने विषाक्त घटक तयार होण्यास प्रतिबंध होतो. काकडी आणि पुदीनायुक्त डिटॉक्स वॉटर : काकडी हायड्रेटिंग आहे आणि त्यामध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात; ज्यामुळे विषाक्त घटक बाहेर टाकण्यास मदत मिळते. पुदीना पाचन तंत्राला आणि यकृताच्या कार्यास समर्थन देतो. यकृताची सौम्यपणे सफाई होण्यासाठी दिवसभर हे पेय प्या. प्रथम आपल्या आहाराकडे लक्ष द्या. कारण- आहार आपल्या शरीरकार्यांना पूरक ठरू शकतो. संतुलित जेवण घ्या, पालेभाज्या, लसूण व काजू यांसारख्या संपूर्ण आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करा. प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा. यकृतावर ताण आणणारे साखरयुक्त, तळलेले किंवा प्रक्रिया केलेले जेवण कमी करा. हायड्रेटेड राहा. कारण- शरीरातील विषाक्त पदार्थ बाहेर टाकण्यासाठी आणि यकृताचे आरोग्य चांगले राखण्यासाठी पाणी आवश्यक आहे.

अल्कोहोल यकृताचे नुकसान करण्यास कारणीभूत ठरू शकतो. म्हणून ते कमी प्रमाणात प्या किंवा ते पूर्णपणे टाळा.

## शरीरातील ऊर्जा कायम टिकवून ठेवण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये बनवा केळी बदाम स्मूदी, वाचा सोपी रेसिपी

लहान मुलांसह मोठ्यांसुद्धा स्मूदी प्यायला खूप आवडते. स्मूदी आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. स्मूदी बनवण्यासाठी वेगवेगळ्या फळांचा, ड्रायफ्रुटसचा वापर केला जातो. थंडीच्या दिवसांमध्ये शरीराची रोगप्रतिकारशक्ती आणि ऊर्जा कमी होत जाते. शरीराची कमी झालेली ऊर्जा वाढवण्यासाठी आहारात वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन करावे. काही लोक घाईगडबडीमुळे सकाळचा नाश्ता करणे टाळतात. सकाळी नाश्ता न करता ऑफिसला निघून जातात. पण असे केल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर नेहमी पोटभर नाश्ता करूनच बाहेर जावे. नाश्ता केल्यामुळे शरीरात ऊर्जा टिकून राहते आणि दिवसभर काम करण्याचा उत्साह शरीरात राहतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये केळी बदाम स्मूदी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया रेसिपी.

साहित्य:

बदाम

केळी

दूध

व्हॅनिला एसेन्स

खजूर

बर्फाचे तुकडे

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

कृती:

केळी बदाम स्मूदी बनवण्यासाठी सर्वप्रथम, ८ ते ९ बदाम रात्रभर पाण्यात भिजत ठेवा.

मिक्सरच्या भांड्यात २ केळी, भिजत ठेवलेली बदाम, थंड दूध, बिया काढून घेतलेले खजूर आणि व्हॅनिला एसेन्स टाकून स्मूदी तयार करून घ्या.

तयार केलेल्या स्मूदीमध्ये तुम्हाला हवे असल्यास बर्फाचे तुकडे टाकून सर्व्ह करा.

तयार आहे

# चार हजार हेक्टरवरील तूर पीक धोक्यात

### ढगाळ वातावरणामुळे अळीचा प्रादुर्भाव

किनवट/शेख शौकत :-तालुक्यात ढगाळ वातावरण वाढल्याने उभ्या तूर पिकावर अळीचा प्रादुर्भाव प्रचंड वाढल्याने लागलेला फुलोरा शेंगा अळ्या फस्त करत असून शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून मार्गदर्शन मिळत नसल्याने कृषी केंद्र चालकाकडून सांगेल त्या औषधी घेऊन फवारणी करत असल्याने शेतकऱ्यांची कापूस सोयाबीन विकून आलेली रक्कम आळ्या मारण्यासाठी घेण्यात येणाऱ्या महागळ्या औषधावर खर्च होत असल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. तालुक्यातील ओलीताची व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यातून विहीर कुपनलिकांच्या पुनर्भरण तथा खोलीकरणासाठी मोठा खर्च करण्यात आला परंतु पाणी पातळी वाढलेली नसल्याने शेतकऱ्यांना ओलीत पीक घेता येत नाही त्यामुळे आहे त्या पाण्यावर तुर पिक तरी व्यवस्थित यावे यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असताना धोके वाढल्याने उभ्या तुर पिकावर मोठ्या प्रमाणात अळीचा प्रदुर्भाव झाला आहे. त्यामुळे महागडी औषधी घेऊन शेतकरी तुर पिकावर फवारणी करताना दिसत आहे. या फवारणीमुळेही अळी जात नसल्याने तूर पीक सरासरीपेक्षा कमी उत्पन्न देण्याचा अंदाज आहे तालुक्यात चार हजार हेक्टरवर पेरण्यात आलेल्या तुर पिक धोक्यात आले आहे. कापूस, सोयाबीन विकून आलेला पैसा यावर फवारणीसाठी खर्च होत असल्याने शेतकऱ्यांचे वर्षभराचे अर्थचक्र विघडत चालले आहे. वर्षभरात होणारे



लग्न इतर कार्यक्रमासाठी जमवून ठेवलेला पैसा या कामी खर्च होत असल्याने शेतकरी पूर्णपणे कंगाल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आश्वासनाप्रमाणे त्वरित कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

## चहासोबत खाल्ली जाणारी खारी आता घरीच बनवा, झटपट नोट करा रेसिपी

चहा हे अनेकांच्या आवडीचे पेय आहे. हे एक लोकप्रिय भारतीय पेय आहे. देशात अनेक चहाप्रेमी पाहायला मिळतात. अनेकांच्या तर दिवसाची सुरुवातच चहाने होत असते. चहाने काम करण्याची ऊर्जा मिळते आणि आळस, थकवाही दूर होतो. चहाप्रेमींसाठी एक उत्तम चहा हा कोणत्या स्वर्गसुखाहून कमी नाही. तुम्हीही जर चहाप्रेमी असाल तर आजची ही रेसिपी तुमच्या फायद्याची ठरणार आहे. चहा हा नेहमी बिस्कीट, खारी, टोस अशा काही स्नॅक्ससह पिला जातो, यामुळे चहाची चव द्विगुणित होते.

बऱ्याचदा हे स्नॅक्स लोक बाजारातून खरेदी करतात मात्र बाजारातील वस्तू नेहमीच चांगल्या असतातच असे नाही. मुळातच या वस्तू फ्रेश नसतात, ज्यामुळे यातीलच एक लोकप्रिय पदार्थ घरी कसा तयार करायचा याची एक सोपी रेसिपी आज आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत. हा पदार्थ म्हणजे, सर्वांच्या आवडीची खारी. खुशखुशीत अशी खारी तुम्ही घारीदेखील अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने तयार करू शकता. याची एक भन्नाट रेसिपी सोशल मीडियावर शेअर करण्यात आली आहे, जी आपण आज या लेखातून जाणून घेणार आहोत. चला तर मग जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य मैदा ओवा मीठ तेल कॉर्नफ्लॉवर तूप

कृती खारी तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात एक कप मैदा घ्या त्यानंतर यात ओवा, थोडे मीठ आणि तेल टाका यानंतर यात हलके हलके पाणी टाकून व्यवस्थित पीठ मळून घ्या हे पीठ जरा घट्टच मळा

आता एका प्लेटमध्ये कॉनफ्लोर आणि तूप घालून याचे एक मिश्रण तयार करा आणि बाजूला ठेवून द्या यानंतर तयार मैद्याच्या पिठाचे गोळे तयार करून याच्या दोन पोळ्या लाटून घ्या त्यानंतर एक पोळी घ्या आणि यावर कॉनफ्लोर, तुपाचे मिश्रण पसरवा

यांनतर या पोळीवर दुसरी पोळी ठेवा आणि दाबून पुन्हा हलकी लाटून घ्या आता या पोळीला एक एक करून घड्या पाडा आणि प्रत्येक घडी करताना त्यावर कॉनफ्लोर, तुपाचे मिश्रण पसरवा

व्हिडिओत दाखवल्याप्रमाणे घड्या करून मग पून्हा हे हलके लाटून घ्या

शेवटी चाकूच्या साहाय्याने याला कापून याचे तुकडे करून घ्या

# गृहमंत्री अमित शहाच्या वक्तव्या निषेधार्थ लातूर शहर वंचित कडून भव्य निदर्शने

लातूर / प्रतिनिधी :- भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सुंदर अशी राज्यघटना दिली, त्यात भारतातील सर्व नागरिकास सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज निर्माण करणे, तेथील सर्व नागरिकात सामाजिक, आर्थिक, न्याय, स्वातंत्र्य, समानता प्रस्थापित व्हावी अशी उदात्त धोरण होते. त्याबरोबरच देशातील सर्व नागरिकांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा मान-सन्मान, आदर , राष्ट्राची एकता आणि एकात्मता आश्वासन देणारी बंधुता निर्माण करणे हा मूळ उद्देश आहे. परंतु ज्या भारतीय संविधानावर हा देश चालतो त्या देशात संसदीय लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करून भर संसदेत देशाचे गृहमंत्री आर एस एस विचारधारेचे अमित शहा यांनी देशाचे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेब या महामानवा बद्दल द्वेशात्मक भावनेने जाणून-बजून अपमान केला. महामानवाला देशातील अनेक जाती धर्मातील लोक हे देवा समान मानतात त्यांचे विचार अनुसरण करतात त्यांना वंदन करतात आणि हेच अमित शहा यांच्या पोटात रुतत असल्याकारणाने संसदेत महापुरुषांच्या बद्दल अवमान कारक आणि केवळ जाती-जाती मध्ये धर्मा-धर्मामध्ये दंगली घडाव्या आणि एकमेका विषयी द्वेष निर्माण व्हावा म्हणून जाणूनबुजून असे




वक्तव्य केल्याचे आहे. त्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी लातूर शहराच्या वतीने आज गांधी चौक लातूर येथे तीव्र निदर्शने करण्यात आले. त्याने केलेल्या वक्तव्याबद्दल अमित शहा ने लवकरात लवकर माफी मागावी अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा या आंदोलना दरम्यान लातूर शहर अध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड यांच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला. यावेळी वंचित बहुजन आघाडी चे मराठवाडा महासचिव संतोषभाऊ सूर्यवंशी, युवक प्रदेश सदस्य अमोल लांडगे, जिल्हा महासचिव रोहित सोमवंशी, शहराध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष शेख खलील,विनोद खटके, डॉ. विजय अजणीकर, बौद्धाचार्य केशव कांबळे,जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे सर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुरेश सूर्यवंशी, प्रचारक सय्यद सुफी साहब,युवक जिल्हा महासचिव नितीन गायकवाड, कामगार माथाडी जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे, लातूर ता.अध्यक्ष सुनील कांबळे, शहर महिला अध्यक्ष सुजाता अजनीकर, शहर महासचिव आकाश इंगळे,ब्लॅक पँथर संस्थापक अध्यक्ष अतुलजी गायकवाड, संस्थापक उपाध्यक्ष उषाताई धावारे, युवक शहराध्यक्ष महिंद्र बनसोडे, शहर सचिव दादासाहेब मस्के, शहर उपाध्यक्ष मनोज लेंढाणे,शहर सदस्य पठाण शरीफ, तालुका उपाध्यक्ष अशोक कांबळे, ड. उड्डाण सिंग,अरुण सूर्यवंशी, संजय सुरवसे, प्रसेनजीत कांबळे, शहर सल्लागार राहुल सूर्यवंशी, कमलाकर कवठेकर इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी जयदीप कवाडे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



नागपूर, : परभणी येथील संविधान प्रतिकृती विटंबना, तसेच कारागृहात भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्युची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना शासनाने ५० लाखांची आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीस सरकारी नोकरीत घेण्यात यावे, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळाचे अध्यक्ष जयदीप कवाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

ते म्हणाले की, २३ डिसेंबरला आपण स्वतः परभणीला जाणार आहे. परभणी येथे या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली. आंदोलनात १०० हून अधिक आंबेडकरी कार्यकर्त्यांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. आंबेडकरी कार्यकर्त्यांवर जे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ते मागे घेण्यात यावे. तसेच पोलिसांनी सुरु केलेले कॉम्बिंग ऑपरेशन थांबवण्यात यावे. यावेळी महासचिव अनिल तुरुकमारे उपस्थित होते.

## केज शहरातील अतिक्रमणावर चालणार बुलडोझर शासन स्तरावर प्रक्रिया सुरू खात्रीलायक सूत्रांकडून आली माहिती समोर



केज/प्रतिनिधी केज शहरातील अतिक्रमणावर लवकरच हातोडा पडणार असून तहसील कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, नगरपंचायत कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांची संयुक्त कारवाई होणार आहे. केज शहरातील अतिक्रमण निघणार असल्याचे सूत्राची माहिती. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील तहसील कार्यालय,पंचायत समिती,पशुवैद्यकीय दवाखाना, सरकारी जुना दवाखाना, शासकीय जुने गोडाऊन, फलोउत्पादनाच्या जागेवरील, कानडी रोड,उमरी रोड, मंगळवार पेठ यासह शहरातील रस्त्यावरील व शासनाच्या जागेतील अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे खात्रीलायक सूत्राकडून माहिती मिळाली आहे. शहरातील अतिक्रमण काढण्यासाठी शासन स्तरावर वेगाने हालचाली चालू आहेत लवकरच वरील सर्व कार्यालयाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक होणार आहे आणि अतिक्रमण काढण्याची तारीख निश्चित होणार आहे.

## महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्या मागणीला यश - आयुक्तांचा केला सन्मान

लातूर :- महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर संघटनेच्या वतीने राज्यातील परिचारीकांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी अनेक आंदोलनं व राज्य कार्यकारिणीच्या वतीने, सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. १००% पदभरती, पदोन्नती व पद निर्मिती ही अनेक आंदोलनातील प्रमुख विषय असून परिचारीकांच्या कंत्राटी भरतीला संघटनेनी कडाडून विरोध केला होता. त्याचा परिणाम म्हणून नुकतेच राज्यात विविध संस्थांमधून ४५०० पदासाठी कायमस्वरुपी पदभरती झाली. त्यामुळे परिचारीका संवर्गातील कर्मचाऱ्यांचे अपुरे मनुष्यबळ ही अनेक वर्षापासूनची समस्येवर काहीअंशी तोडगा निघाला.

आताच वैद्यकिय संचालनालयाने अनेक वर्ष प्रलंबित परिसेविका पदांच्या पदोन्नती केल्या. ही पदोन्नती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडली. अनेक परिसेविकांना कार्यरत संस्थेतच रिक्त पदांवर पदस्थापना दिल्या तर इतरांना जवळच्या संस्थेत पदस्थापना करण्यात आल्या. राज्यात प्रथमच परिसेविका पदाच्या १००० पदोन्नती ही परिचारीका संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी ऐतिहासिक बाब ठरली. यामुळे वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहीलेल्या परिचारीका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या आशा बळावल्या आहेत असे राज्याध्यक्ष डॉ. मनिषा शिंदे यांनी सांगितले. अद्यापही,- १. परिचारीकांचे ४० वर्षांपासून प्रलंबित भत्ते २. सातव्या वेतन आयोगाच्या वेतन त्रुटी. ३. सर्व पदांच्या १००% पदभरती. विविध स्तरांवरील पदांच्या







पदोन्नती जसे - सहाय्यक अधिसेविका, पाठ्य निर्देशिका, प्राध्यापक , प्राचार्य ई.; पदनिर्मिती, ४. परिचारीकांचे पदनाम बदल ५. विद्यार्थी परिचारीकांचे विद्यावेतन- तसेच इतर महत्त्वाच्या मागण्यांसाठी संघटनेच्या स्तरावरुन पाठपुरावा केला जात आहे. बक्षी समिती खंड दोन मधील अन्य सर्व पदांच्या त्रुटी दूर करण्यासाठी संघटनेचे कार्याध्यक्ष -श्री अरुण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय न्यायालय व खुल्लर समितीकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

डिसेंबर २४ मध्ये झालेल्या परिसेविका पदांच्या पदोन्नतीसाठी परिचारीका संवर्गामध्ये समाधान व्यक्त होत आहे. यानिमित्ताने महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचे आयुक्त मा. श्री राजीव निवतकर साहेब, सहसंचालक डॉ विवेक पाखमोडे साहेब व पदोन्नती समितीचे सदस्य सचिव व मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री जनक जोशी साहेब यांचा सन्मान केला तसेच या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करुन इतर प्रलंबित मागण्यासाठी संचालनालयाच्या वतीने सकारात्मक व वेगाने कार्यवाही होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उपाध्यक्ष शाहजाद बाबा खान, राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे , सेंट जॉर्ज शाखेच्या अध्यक्ष कामिनी सोनवणे, गो.ते.रु शाखेच्या अध्यक्ष स्मिता म्हसकर, अकोला शाखेच्या अध्यक्ष- जया खंबलकर, शाखेच्या सल्लागार व एम एन सी सदस्य एकता रंगारी मॅडम, अनुसया सावरगावे मॅडम, एड्खड मुलुंड शाखेच्या अध्यक्ष वासंती कदम इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा- अँड आशोक माने

केज/ प्रतिनिधा परभणी येथील मयत सोमनाथ सुर्यवंशीचा पोलीस कस्टडीत झालेल्या मृत्यू च्या निषेधार्थ केज तहसीलदार यांच्या मार्फत कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या विधार्थ्याचा परभणी पोलीसांनी अमानुष मारहाण करुन हत्या केल्या प्रकरणी दोषींना कडक शाषण करावे अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. दरम्यान, मयत सोमनाथ सुर्यवंशीच्या व मस्साजोग येथीलसरपंच यांच्या मारेकऱ्यांना कडक शासन करावे अन्यथा राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा, असा इशारा इंडियन ह्युमन राईट आसोशीयनचे जिल्हाध्यक्ष अँड अशोक माने यांनी प्रशासनाला दिला आहे. परभणी येथील दंगलितील तथाकथित आरोपीच्या मोबाईल मधून नंबर काढून 'कायद्याचे शिक्षण - घेणाऱ्या सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या वडार समाजाच्या विद्यार्थ्याला ताब्यात घेवून पोलिसांकडून अमानुष मारहाण करण्यात आली आहे. सदर तरुण कायदा व पीएच. डी. चा विद्यार्थी असुन पुणे येथील रहिवाशी व परभणी येथे शिक्षण घेत होता. सदर विद्यार्थीचा परभणीच्या दंगलीत कुठलाही संबंधनसताना दंगलीतील तथाकथित आरोपीच्या मोबाईल मधील संपर्कावरून त्यास ताब्यात घेवून पोलिसी अत्याचार झालेला आहे. त्याचबरोबर या प्रकरणात दोषी असणाऱ्या सर्व पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी. परभणी संविधान योद्ध्यावर पोलिसांकडून करण्यात आलेल्या छळाचा सर्व नागरिकांकडूनकरण्यात येत असून या पुढील सर्व आंदोलनात इंडियन ह्युमन राईट्स आसोशीयन पूर्ण शक्तीनिशी सहभाग घेत असून संविधानाचा अपमान दलित समाज सहन करणार नाही.



त्याचबरोबर विनाकारण. निरपराधी नागरिकांना, विद्यार्थ्यांना व युवकांना पोलिसी अत्याचारांत बळी घालण्याचा प्रकार सहन करणार नाही. याची दखल शासनाने तात्काळ घ्यावी अन्यथा तीन लक्षवेधी आंदोलने करण्यात येईल असा इशारा सदर निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. कॉबीग आपरेशनच्या नावाखाली आंबेडकरी जनतेवर अमानुष अत्याचार आज मागासवर्गीय आंबेडकरी जनतेच्या विरोधात कॉबीग आपरेशनच्या नावाखाली जाणुन बुजुन अटक करणे त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणे हा पोलीसांचा हातखंडाच झालेला आहे, आंबेडकरी जनतेवर अमानुष प्रकारे अत्याचार करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच मयत सोमनाथ सुर्यवंशी याचा खुन करणार्या पोलिस कर्मचारी यांच्या विरोधात मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करुन एसआयटी व्दारे तपास करावा व ईतर आरोपीला तात्काळ आटक करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे,

## गोळीबार करणाऱ्या आठवले गँग मधील तिघांच्या पुण्यातुन मुसक्या आवळल्या

बीड/प्रतिनिधी जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून हत्या, गोळीबार अशा घटनांनी भीतीचं वातावरण आहे. बीड शहरात जुन्या भांडणाची कुरापत काढून एकावर घरात घुसून गोळीबार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत गोळीबार करणाऱ्या आठवले गँगच्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने पुण्यात अटक अक्षय आठवले, मनीष क्षीरसागर, ओंकार सवाई असे अटक केलेल्या आरोपीचे नावे आहेत. ओंकारला बीडमधून तर अक्षय आठवले आणि मनीष क्षीरसागरला पुण्यातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यात मनीष क्षीरसागर आणि अक्षय आठवलेवर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते. अखेर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून आरोपीला पुण्यातून अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मुरकुटे, मुन्ना वाघ यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी ही मोठी कारवाई केली आहे.

# टेंभुर्णी- लातूर महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता ५७४ कोटी रुपये मंजूर -खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

धाराशिव:- धाराशिव उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाचा हत्त्वाचा महामार्ग टेंभुर्णी-लातूर हा महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी कुर्डूवाडी बार्शी पांगरी धाराशिव जिल्ह्यातील येडशी तडवळा ढोकी व लातूर जिल्ह्यातील मुरुड या मोठ्या बाजारपेठांना जोडणारा व मराठवाडा चे प्रवेशद्वार असलेले बार्शी शहरातून थेट पश्चिम महाराष्ट्राचे संपर्क निर्माण करणारा महत्त्वाचा मार्ग आहे या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न शेकडो वर्षापासून प्रलंबित होता. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दि. २९ संप्टेबर २०१९ रोजी भेट घेतली होती त्यानंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान प्रश्न क्रमांक ७१ द्वारे तारांकित प्रश्न विचारला होता त्यानंतर ९ मार्च २०२१ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान नियम ३७७ द्वारे लक्षवेधी प्रश्न विचारून सभागृहाचे लक्ष वेधले होते. दिनांक ५ एप्रिल २०२१ रोजी निवासस्थानी भेट घेऊन सदर प्रश्न संदर्भात चर्चा केली होती.

दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते तसेच २१ जानेवारी २०२१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री माना श्री उद्धवजी ठाकरे यांच्या समवेत झालेल्या सर्वपक्षीय खासदारांच्या बैठकीत सदर प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा केली होती. दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान माननीय नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन सदर विषयाच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात आला होता. दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी माननीय मंत्री महोदय यांच्या निवासस्थानी या प्रश्नाच्या अनुषंगाने भेट घेतली व सदर मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत पाठपुरावा केला होता तसेच लोकसभेत लोकसभेचा सदस्य या नात्याने विविध आयुधाचा वापर करत संबंधित प्रश्नाकडे सभागृहाचे वारंवार लक्ष वेधले होते तसेच लक्षवेधीच्या माध्यमातून व तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून अनेक वेळा या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या संदर्भाने पाठपुरावा केला होता. चालू शेवाळे अधिवेशना दरम्यान खासदार महोदयांनी प्रश्न उत्तराच्या तासांमध्ये माननीय नितीनजी गडकरी यांना सोलापूर-उमरगा रामा ६१, धुळे -सोलापूर रामा२११, नागपूर -रत्नागिरी रामा ३६१ सह टेंभुर्णी-लातूर या मार्गाच्या संदर्भाने प्रश्न विचारले होते.

लोकसभेच्या अधिवेशन काळात मा. नितीनजी गडकरी यांनी खासदार महोदय यांना प्रत्यक्ष भेटण्यासंदर्भात सांगितले होते. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन या महामार्गाच्या अनुषंगाने काल गडकरी साहेब यांच्या निवासस्थानी भेटीदरम्यान समक्ष चर्चा केली. यावेळी मंत्री महोदयांनी सदर महामार्गास ५७४ कोटी रुपये मंजूर केले असल्याचे त्याच्या फेसबुक पेज वर कळविले आहे. सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता अनेक वर्षापासून प्रयत्न चालू होते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,प्रकल्प संचालक नांदेड यांच्याकडे विविध बैठकीदरम्यान सदर महामार्गाच्या चौपदरीकरण करण्याकरिता आढावा घेण्यात आला होता. टेंभुर्णी लातूर चौपदरीकरण संघर्ष समितीच्या वतीने अनेक वेळा आंदोलन देखील करण्यात आले होते तसेच या समितीच्या वतीने नागपुर येथे आमरण उपोषण करण्यात आले होते या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.



यामुळे शिक्षणासाठी व मोठी बाजारपेठ असलेल्या लातूर शहराशी व पश्चिम महाराष्ट्रातील अन्य महत्त्वाच्या शहराशी थेट संपर्क होण्यास व दळणवळण दरम्यान होणारा विलंब या सर्व समस्यांचा निपटारा होणार असून या महामार्गाच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांचा कमी वेळेत व जलद गतीने संपर्क स्थापित होणार आहे. सदर प्रश्न सोडविल्यामुळे परिसरातील नागरिकांत समाधान व्यक्त करण्यात येत आहे तसेच खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचे अभिनंदन होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE